# हस्तामलक स्तोत्र

## भावदर्शन

## (हस्तामलकीयम्)

विवरण

डॉ. श्री. द. देशमुख

प्रकाशक - श्रीकृपा न्यास
२२७ अ, गोकुळपेठ,
नागपूर- ४४००१०.

मुद्रक - मुद्राशिल्प ऑफसेट प्रिंटर्स
बजाज नगर, नागपुर
दूरध्वनि - २२३१७१६

© श्रीकृपा न्यास, नागपूर

प्रकाशन तिथि - ऋषिपंचमी शके १९३९
शनिवार दि. २६ ऑगस्ट २०१७

अक्षर जुळणी - डॉ. ज्योत्स्ना पाटणकर

प्रसाद भेट
वैयक्तिक उपयोगाकरिता

www.shrikrupaprakashan.com

# हस्तामलक स्तोत्र

## भावदर्शन

## (हस्तामलकीयम्)

विवरण

डॉ. श्री. द. देशमुख

# लेखकाचे मनोगत

श्रीशंकराचार्यांच्या चार प्रमुख शिष्यांपैकी आचार्य श्रीहस्तामलक ह्यांचा हा फक्त १२ श्लोकांचा ग्रंथ आहे. अत्यंत कमी शब्दात पण तरीही परिपूर्ण असे आत्मस्वरूपाचे वर्णन केलेले येथे आढळते. अनेक श्लोकांचे पालुपद 'स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा' हे आहे. म्हणजेच केवळ आत्मस्वरूपाचे वर्णन सांगण्याचे येथे उद्देश नसून वेदान्ताचे जे अन्तिम तत्त्वज्ञान आहे, ते जीवब्रह्मैक्य येथे सांगितले आहे. जीवब्रह्मैक्य सांगणारे ते उपनिषद् ह्या न्यायाने ह्या ग्रंथाला उपनिषदाचा दर्जा नक्कीच आहे.

ह्या छोटेखानी ग्रंथावर थोडे चिंतन प्रस्तुत ग्रंथात केले आहे. वेदान्ताचा थोडाफार अभ्यास असल्याशिवाय हा ग्रंथ समजणे थोडे कठीण जाईल पण तरीही सर्वांनाच ह्याचा उपयोग होईल असे वाटते.

डॉ. श्री. द. देशमुख
मुरगुड

# प्रकाशकीय

वेदान्तशास्त्रातील अत्यंत सारभूत अशा बाबी शक्य तितक्या सरलतेने सांगणाऱ्या 'हस्तामलकीय' ह्या आचार्य हस्तामलक ह्यांच्या ग्रंथाचे प. पू. डॉ. श्रीकृष्ण द. देशमुख ह्या अधिकारी लेखकाने वाचकांना घडवलेले भावदर्शन म्हणजे आमचे हे नूतन प्रकाशन पुष्प.

'हस्तामलकीय' ह्या ग्रंथाच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे तो 'आटोपशीर' आहे आणि दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याला आचार्य हस्तामलकांचे श्रीगुरू पूज्यपाद भगवान श्रीआदिशंकराचार्य ह्यांनी प्रस्तावना लिहून स्वतः आपल्या शिष्याचा गौरव केला आहे ही आहेत.

हा ग्रंथ आटोपशीर आहे कारण त्यांत फारसे खंडण-मंडण, पूर्वपक्ष-उत्तरपक्ष इत्यादी नाहीत. खंडणमंडणानंतर मान्य, सिद्ध झालेले सिद्धान्त आणि अनुभवाचे बोल येथे थेट प्रतिपादित केलेले आहेत. त्यामुळे 'गुरुवाक्येषु विश्वासेषु नाम श्रद्धाः' अशी श्रद्धा ज्यांच्याजवळ आहे त्यांना, किंवा पूर्वपक्ष-उत्तरपक्ष इ. पद्धतीने अभ्यास करण्याइतकी अनुकूलता ज्यांना नाही त्यांनाही ग्रंथाचा तत्काल व अधिक लाभ होईल.

जगद्गुरू आद्य श्रीशंकराचार्यांच्या अनेक रचनांवर लेखन करून झाल्यानंतर त्यांच्या शिष्यपरिवारातील अधिकारी व्यक्तींच्या साहित्यावर आता डॉ. श्री. द. देशमुख विवेचन

करीत आहेत. ह्यापूर्वी श्रीसुरेश्वराचार्यांच्या 'नैष्कर्म्यसिद्धी' ग्रंथावर तसेच त्यांचे शिष्य श्रीसर्वज्ञात्ममुविरचित 'संक्षेपशारीरक' नामक ग्रंथावर त्यांनी विवेचन केले आहे. 'हस्तामलकीयम्' हा ह्या प्रकारचा तिसरा ग्रंथ.

हा ग्रंथही वेदान्तशास्त्रप्रेमींना आवडेल आणि उपयुक्त वाटेल असा विश्वास वाटतो.
इति लेखनसीमा

श्रीकृपा न्यास
नागपूर

।।श्री।।

# हस्तामलक स्तोत्र

भ. शंकराचार्यांच्या चार प्रमुख व क्रियाशील शिष्यांपैकी आचार्य हस्तामलक हे आहेत. ह्या शिष्याच्या रचनेवर खुद्द शंकराचार्यांनी टीकात्मक स्पष्टीकरण लिहून त्यांत ह्या शिष्यालाच ‘आचार्य’ असे म्हटले आहे. फार मोठ्या विभूतीच असे करू शकतात. त्यामुळे हस्तामलकाचार्यांचा अधिकार अधिकृत व अधोरेखित झाला आहे. ग्रंथाची सुरुवात आचार्यांनी त्यांच्याकडे आलेल्या एका बालकाला (हस्तामलक) विचारलेल्या प्रश्नाने झाली आहे.

**कस्त्वं शिशो, कस्य कुतोऽसि गन्ता**
**किं नाम ते त्वं कुत आगतोऽसि।**
**एतन्मयोक्तं वद चार्भकत्वं**
**मत्प्रीतये प्रीतिविवर्धनोऽसि।।१।।**

अर्थ – हे बाळा! तू कोण आहेस? कोणाचा मुलगा आहेस? तू कुठे जात आहेस? तुझे नाव काय? तू कोठून आलास? बाळा, मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दे त्याने माझे समाधान होईल. तुझ्याकडे पाहूनच मला प्रेम वाटत आहे. प्रेम वाटावे असाच तू आहेस।।१।।

'शंकर दिग्विजय' ह्या स्वामी विद्यारण्यांनी लिहिलेल्या भगवान आचार्यांच्या रसाळ चरित्रात, सात वर्षांचा एक शिशु आचार्यांच्या दर्शनाला आल्यानंतर त्याचे खरे

स्वरूप कसे समोर आले त्याचे रसभरित वर्णन केले आहे. भ. शंकराचार्य हे मूकांबिका देवीच्या मंदिरात वास्तव्याला असतांना त्याजवळच असलेल्या श्रीबाली नावाच्या खेड्यात गेले होते. त्या गावात प्रभाकर ह्या नावाचा विद्वान, वेदविद्यासंपन्न व श्रीमंत ब्राह्मण राहत होता. त्याला सर्वजण सर्वप्रकारे मान देत होते. परंतु त्यांना सात वर्षांचा एक ‘मतिमंद’ मुलगा होता. तो मूक व वेडसर असल्याप्रमाणे राहत होता. भ. आचार्यांची कीर्ती ऐकून प्रभाकर त्या मुलाला घेऊन आचार्यांच्या दर्शनाला गेले. त्यांनी मुलाला त्यांच्या चरणांवर घातले आणि स्वतःच्या मुलाची अवस्था मोठ्या दुःखाने सांगितली. आचार्यांना त्यांनी व त्यांच्या पुत्राने

दंडवत घातल्यानंतर तो पुत्र मात्र दीर्घकाळपर्यंत आचार्यचरणांवर पडूनच राहिला. आचार्यांनी अत्यंत प्रेमभराने व दयाळूपणाने त्याला उचलून घेतल्यावर प्रभाकर आचार्यांना म्हणाले की 'हा मुलगा वेदाभ्यास तर दूरच राहिला पण निखळ अक्षरशत्रू आहे. त्याच्या बुद्धीची वाढच झालेली नाही. बरोबरीच्या मुलांशी हा खेळत वा बोलतही नाही. त्यांनी त्याला मारले, ठोकले तरी तो शांतच असतो. कधी तरी तो थोडे काही खातो पण एऱ्हवी उपाशीच राहतो. त्याला 'सुधारण्याचे' माझे सर्व प्रयत्न संपले असून आता आपणच त्याच्यावर कृपा करावी. आचार्यांनी त्या मुलाला प्रश्न विचारला की तू कोण आहेस? असा विचित्र का वागतोस?

जडमूढ असल्याप्रमाणे का जगतोस? तेव्हा तो मुलगा स्पष्टपणे बोलू लागला व म्हणाला –

हस्तामलक उवाच –

**नाहं मनुष्यो न च देवयक्षो**
**न ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्राः।**
**न ब्रह्मचारी न गृही वनस्थो**
**भिक्षुर्न चाहं निजबोधरूपः।।२।।**

अर्थ – हस्तामलक म्हणाला, ‘मी कोणी माणूस नाही किंवा देव, यक्षही नाही. मी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्रही नाही. मी ब्रह्मचारी, गृहस्थाश्रमी, वानप्रस्थी किंवा संन्यासी नाही. मी केवळ ज्ञानस्वरूप (आत्मा) आहे’.।।२।।

‘मी माणूस देव वगैरे नाही तसेच कोणत्याही वर्णाचा किंवा आश्रमाचाही नाही.

मी जडमूढ नक्कीच नाही. माझ्या सहवासात आलेल्या अचेतनाला सुद्धा चेतनत्व येते. मी आनंदरूप असून मला जन्ममरणादी एकही विकार नाही.' नंतर त्याने सर्व उपनिषदांचे सार ज्या बारा श्लोकात सांगितले, तीच ही हस्तामलकीय रचना आहे. हीच रचना पुढे 'हस्तामलकीय' ह्या नावाने प्रसिद्धीस आली कारण तळहातावरील आवळा जसा स्पष्ट दिसावा तसाच त्याला आत्मानुभव होता. हे ऐकून आचार्य प्रभाकरांना म्हणाले की हा वरवर जडमूढ व मूक दिसणारा तुझा मुलगा पूर्वार्जित महापुण्यामुळे स्वरूपाचा पूर्णानुभवी आहे. सर्व बंधनातून तो मुक्त असून त्याला स्वतःच्या शरीराचे 'अहं'रूपाने भान नाही. ह्या मुलाला मी

माझ्याबरोबर घेऊन जातो. आचार्यांनी त्याला शिष्य म्हणून स्वीकारून ते पुढील प्रवासाला निघाले.

पुढे भ. आचार्य त्यांच्या अन्य शिष्यांसह असतांना त्यांनी हस्तामलकांच्या बालपणीच्या ज्ञानस्थितीचे रहस्य सांगितले. ते असे –'हा हस्तामलक दोन वर्षांचा असतांना त्याची आई त्याला घेऊन स्नानासाठी नदीवर गेली होती. ती स्नान करीत असतांना हस्तामलक नदीमध्ये खेळत खेळत गेला व बुडून मरण पावला. हे त्या मातेच्या लक्षात येताच तिने दुःख व शोकाने हंबरडा फोडला. वास्तविक त्या मातेने नदीकाठी बसून तपश्चर्या करणाऱ्या एका महात्म्याला मुलावर लक्ष ठेवण्यास सांगितले होते पण तो

अचानक समाधीत गढून गेल्याने त्याचे मुलाकडे लक्ष राहिले नाही. हंबरडा ऐकताच त्याचे समाधीतून व्युत्थान झाले व नंतर सर्व प्रकार त्याच्या लक्षात आला. त्या मातेच्या कळवळ्यामुळे त्याने स्वतःच्या प्राणांचे विसर्जन करून, स्वदेह सोडून त्या मुलाच्या देहात योगसामर्थ्याच्या बळावर प्रवेश केला. त्या योग्याला एका जन्माचे प्रारब्ध शिल्लक होते. आणखी एक जन्म घेणे त्याला अनिवार्य होते. स्वदेह सोडल्यामुळे त्याचे ते प्रारब्धही संपले व दुसऱ्या देहात येताच त्याला तत्काळ ज्ञान झाले. त्यामुळे ज्या मुलाचे नवीन शरीर त्याने स्वीकारले होते, तो मुलगाही ज्ञानी झाला. वामदेवाला नऊ जन्मांचे प्रारब्ध होते व त्यामुळे

शेवटच्या जन्मात गर्भाशयातच तो ज्ञानी झाला. अनिवार प्रारब्ध प्रतिबंध असला की असे होऊ शकते असे श्रीविद्यारण्यस्वामी पंचदशीत सांगतात. प्रारब्धानुसार एखादा जन्म घ्यावा लागतो.

हस्तामलकीयावर लिहिलेल्या ग्रंथाला भ. शंकराचार्यांनी स्वतः प्रस्तावना दिली आहे. जगातील प्रत्येक जीवाचे सर्व जीवन सर्वकाळ सुखाच्या अपेक्षेने व्यापून गेलेले असते. दुःख कधीच मिळू नये ही त्याच अपेक्षेची दुसरी बाजू आहे. सर्वांच्या सर्व हालचाली केवळ ह्याच उद्देशाने चालू असतात पण अनंत जन्मांच्या शुद्ध पुण्यामुळे क्वचित् कोणाच्या तरी लक्षात येते की पंचज्ञानेंद्रियांकडून मिळणारी सुखे अल्पजीवी

असून त्यांची दुःखात परिणती होते. ह्याचा परिणाम म्हणून तो सर्व इंद्रियसुखांविषयी निरिच्छ होऊन, प्रपंचचक्रातून म्हणजे पर्यायाने जन्ममरणातून दूर होण्याचा मोठा प्रयत्न करतो. स्वरूपाचे अज्ञान हेच संसारचक्रात अडकून पडण्याचे मूळ कारण असल्याने स्वरूपाचे स्वानुभवरूप ज्ञान झाल्यानेच ते अज्ञान दूर होईल हे तो जाणतो. हे स्वतःला झालेले ज्ञान आचार्य हस्तामलक सांगत आहेत.

आत्मस्वरूप --

**निमित्तं मनश्चक्षुरादिप्रवृत्तौ**
**निरस्ताखिलोपाधिराकाशकल्पः।**
**रविर्लोकचेष्टानिमित्तं यथा यः**
**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।३।।**

अर्थ – नित्यत्वाने शुद्धज्ञानरूप असलेला आत्मा मी आहे. मन, डोळे इत्यादी त्याच्याच सत्तेवर विषयज्ञानाचे ग्रहण करतात. सूर्यप्रकाशात चालणाऱ्या लोकव्यवहाराप्रमाणे हे जाणावे. 'घटातील आकाश' ह्या शब्दप्रयोगात घटाने जणू मर्यादित झालेले आकाश असावे त्याप्रमाणे मनादी उपाधी निरस्त झालेला मी आत्मरूप आहे.।।३।।

जीवाच्या जाग्रतादी तीन अवस्थात अलिप्तपणे व्यापून असलेला शुद्धज्ञानरूप आत्मा हे जीवाचे खरे स्वरूप आहे. मनाला 'मनपणा' व डोळ्याला 'दिसणेपणा' ज्ञानरूप आत्म्यामुळे आहे. प्रत्येक वृत्तिज्ञानामध्ये ज्ञानरूप आत्मा असतो. सूर्याच्या प्रकाशात जगातील सर्व

व्यवहार चालत असले तरी त्या व्यवहारांपासून सूर्य सहजच अलिप्त असतो. 'तो अलिप्त आहे' हे बोलणे सुद्धा केवळ औपचारिक आहे. सूर्य त्याच्या प्रकाशात कोण काय करीत आहे, कोणी काय करावे, काय करू नये इत्यादींविषयी पूर्णपणे बेदखल असतो. त्याप्रमाणे ज्ञानरूप, स्वयंज्योती व नित्यप्रकाशमान आत्मा सर्वत्र समत्वाने व्यापून आहे. 'कळणे' अशा अर्थाने 'प्रकाश पडणे' असा शब्दप्रयोग विनोदाने केला जातो. सद्रूप आत्मा नित्य असल्याने स्वयंज्योतीही नित्य प्रकाशमान आहे.

जागृतीत ज्ञानरूप आत्मा स्पष्टपणे कळणे कठीण नाही. स्वप्नातही स्वप्नातील पदार्थ प्रत्यक्ष न दिसता वा ऐकू येता त्यांचे ज्ञान होत

असल्याने ज्ञानरूप आत्म्याचे अस्तित्व लक्षात येणे फार कठीण नाही. पण गाढ झोपेतही त्याचे ज्ञानरूपत्व अबाधित असते हे समजणे कठीण पडते. गाढ झोपेत अन्तःकरण लीन असते. स्वप्न पडतांना ते किंचित जागे होते व जागृतीत ते पूर्ण जागे होते. गाढ झोपेची म्हणजे अन्तःकरण पूर्णपणे लीन होण्याची अवस्था आल्याशिवाय स्वप्नासाठी ते किंचित जागे होण्याची अवस्था येत नाही. स्वप्नात पदार्थ कळतात पण त्या कळणाऱ्या पदार्थांबरोबर त्यांचे ज्ञान बाहेरून आत येत नाही. शुद्धज्ञानस्वरूप हे स्वयंज्योती, नित्यप्रकाशमान असल्याने ज्ञान होण्याची आतच व्यवस्था आहे. म्हणून आत्मा तिन्ही अवस्थात व्यापून असला

व आत्म्याचा अवस्थांच्यात अन्वय असला तरी आत्म्यात अवस्थांचा व्यतिरेक आहे. गाढ झोप लागून जाग आल्यानंतर 'मला कसलेही भान नव्हते व मी सुखात होतो' असे स्मरण असते. संस्काराशिवाय स्मृती नसते. म्हणून सुषुप्तीतही ज्ञानरूप आत्मा असल्यामुळेच सुखाच्या ज्ञानाचे संस्कार उमटतात.

'सूर्यामुळे प्रकाश मिळतो' हे वाक्य म्हणणाऱ्याच्या दृष्टीने योग्य असले तरी 'माझ्यामुळे प्रकाश मिळतो' असे सूर्य म्हणत नाही. तसे 'आत्मप्रकाशात ज्ञान होते' हे वाक्य साधकाच्या दृष्टीने बरोबर असले तरी ज्ञानरूप आत्म्याला असे ज्ञान नसते. (सूर्याचे उदाहरण अचेतनाचे असले तरी ते विषय समजण्यासाठी

उपयुक्त आहे.)

जीव वासनेला अनुसरून कर्मे करतो. ती शुभ वा अशुभ, पुण्यात्मक वा पापात्मक, योग्य वा अयोग्य इत्यादी कशीही असली तरी त्यांचा आत्म्याला जराही स्पर्श होत नाही. कारण अमन, अप्राण, अजिव्ह, अनेत्र (मुं. उप.), ज्ञानरूप आत्म्याच्या बाबतीत, तो ती काहीच करीत नाही व म्हणून ती त्याला 'कळत' नाहीत. 'तो आत्मा मी आहे' असा दृढ, अपरिवर्तनीय व अपरोक्ष अनुभव घेणारा 'अपापविद्ध' होतो. '**स विद्वान् पुण्यपापेविधूय निरञ्जनः परमम् साम्यमुपैति**' (मुं. १-३-१) असे त्याविषयी श्रुती सांगते. 'आत्म्याच्या सत्तेवर दृश्याचे सर्व व्यवहार चालतात' हे बोलणेही अध्यारोपाचे

आहे. असे बोलावेच लागते कारण अज्ञानी जीव देह व जगत् सोडून क्षणभरही विचार करू शकत नाही. ते संदर्भ सोडून त्याच्या जीवनाचा विचार अशक्य आहे. ह्याला 'व्यावहारिक सत्ता' असे म्हणतात. 'अपवाद' सांगणाऱ्या पारमार्थिक सत्तेत ह्यातील काहीही व कसेही नाही. असे म्हणणाराही कोणी नाही व त्याला तसे म्हणण्यासाठीही काही नाही. असा अनुभव येईपर्यंत भ. शंकराचार्य दृश्याला अध्यस्ताचा दर्जा देतात व अध्यस्ताला अधिष्ठान सांगावेच लागते म्हणून ब्रह्मावर अधिष्ठानत्वाचा आरोप करतात. '**आधी मिथ्या उभारावे। मग ते वोळखोन सांडावे।**' (दास. ७-३-४) असे समर्थ अत्यंत समर्पकपणे म्हणतात.

'दगड पाण्यात बुडल्यावर दगडातील ब्रह्म पाण्यातील ब्रह्मात बुडत नाही' हे वाक्य विचारात घेतले तर दगड व पाणी ही दोन्ही अध्यस्त असून ब्रह्म अधिष्ठान आहे. दगड पाण्यात बुडतो हा व्यावहारिक अनुभव व्यवहारापुरता ठीक असला तरी दगड व पाणी ह्या दोन्ही उपाधी आहेत. उपाधी कल्पित असल्याने त्यांच्यात होणारा व्यवहारही कल्पित आहे. अव्यवहार्य ब्रह्मात अशा व्यवहाराची कल्पनाही करता येत नाही.

आकाशाशी ज्याप्रमाणे ढग, धूळ, वारा, निळेपणा, अर्धगोलाकार इत्यादिकांचा जराही संबंध पोहोचत नाही त्याप्रमाणे आत्मस्वरूपाशी देह, अवस्था, काल, जन्मादी, यशापयश

इत्यादिकांचा जराही संबंध येत नाही. असे स्वरूप मी आहे हे अनुभविणारा ह्या सर्वांपासून सहजच अलिप्त असतो. त्यांचे सुखदुःखादी त्याच्या अनुभवात नसतात.

आत्मा अखंड ज्ञानस्वरूप आहे --

**यमग्न्युष्णवन्नित्यबोधस्वरूपं**
**मनश्चक्षुरादीन्यबोधात्मकानि।**
**प्रवर्तन्त आश्रित्य निष्कम्पमेकं**
**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।४।।**

अर्थ - उष्णता हा जसा अग्नीचा स्वभाव आहे त्याचप्रमाणे नित्यबोधरूपत्व हे आत्म्याचे स्वरूप आहे. ज्यांच्यामुळे बोध होतो असे वाटते ते मन, डोळे इत्यादी त्या नित्य तेवणाऱ्या एकमेव ज्ञानज्योतीच्या आश्रयाने आहेत. असा

सत् रूपाने अखंड असणारा आत्मा हे माझे स्वरूप आहे.।।४।।

आत्म्यासंबंधी बोलतांना स्वभावाच्या भाषेत न बोलता स्वरूपाच्या भाषेत बोलणे चांगले. अर्थात उष्णता व अग्नी परस्परांपासून वेगळे करता येत नाहीत त्याप्रमाणे आत्मा व ज्ञान एकरूप आहेत ह्या दृष्टीने स्वभाव म्हणता येतो. फूल रंगीत असते हे खरे असले तरी फुलाला सोडून रंग इतरत्र असतो. पण उष्णता अग्नीला सोडून कधीच नसते. त्याप्रमाणे शुद्ध ज्ञानरूपता आत्म्याला सोडून कोठे नसते. ती वेगळेपणाने स्वतंत्र कोठेच नसते.

ज्ञानेंद्रिये व मन ही पंचभूतांची निर्मिती असल्याने ती अचेतन व म्हणून प्रकाश्य आहेत.

त्यांना स्वतःची जाणीव नाही. त्यांना त्यांच्यात व्यापून असणाऱ्या अन्तःकरणातील चिदाभासामुळे ज्ञान ‘होण्याची’ क्षमता येते, ती चिदाभासामुळे ‘Activate’ होतात. अकर्ता आत्मा ती क्षमता निर्माण करीत नाही. दिव्यात दिसणारा प्रकाश त्यांतील वेगवेगळ्या प्रकारचा ज्योतींचा असतो. तरी ‘दिव्याचा प्रकाश’ असेच व्यवहारात म्हटले जाते. आत्मा व चिदाभास ह्यातील फरक लक्षात न घेतल्यामुळे व व्यापक आत्मा सर्वत्र समत्वाने व्यापून असल्याने, तसे ऐकल्यावर एक प्रश्न उपस्थित होतो. ह्या परिस्थितीत एकाला जर दुःख झाले तर ते सर्वांना व्हावयास हवे व सुख झाले तर तेही सर्वांना झाले पाहिजे. पण असे तर दिसत नाही.

ह्याचे स्पष्टीकरण --

**मुखाभासको दर्पणे दृश्यमानो**
**मुखत्वात् पृथक्त्वेन नैवास्ति वस्तु।**
**चिदाभासको धीषु जीवोऽपि तद्वत्**
**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।५।।**

अर्थ - आरशात दिसणाऱ्या मुखाच्या प्रतिबिंबाला बिंबाशिवाय स्वतःची सत्ता नसते. त्याप्रमाणे जीव हा आत्मस्वरूपाचा अन्तःकरणातील आभास असून त्याला वेगळेपणाने स्वतंत्र सत्ता नाही. अखंड ज्ञानरूप असलेला आत्मा हे माझे खरे स्वरूप आहे.।।५।।

जीव ह्या संकल्पनेच्या संदर्भात आभासवाद व बिंबप्रतिबिंबवाद अशी दोन

स्पष्टीकरणे वेदान्तशास्त्रात दिली आहेत. दोन्हींचा निर्णय एकच आहे की प्रतिबिंबाला वा आभासाला स्वतंत्र सत्ता नाही. सुख व दुःखादी अनुभव जीवाला येतात म्हणजे ते बुद्धिस्थ चिदाभासाला येतात. आत्म्याला येत नाहीत. अज्ञानामुळे 'मी आत्मा' असे कळण्याऐवजी 'मी जीव' असा निश्चय असल्याने जीवाचे धर्म आत्म्याचे वाटतात. वास्तविक शुद्ध ज्ञानस्वरूपाला कोणतेही वृत्तिज्ञान होत नाही. सुखदुःखादी अनुभव साक्षिभास्य असून ते 'दृश्य' ह्या प्रकारात असल्याने अचेतन आहेत. दृक्‌रूप आत्मा प्रकाशरूपाने चेतन आहे. तोच 'मी'चे खरे स्वरूप आहे व तो निरपेक्ष व्यापक व बोधरूप आहे. परिणाम, परिच्छेद व परिताप हे

सर्व 'अहं' (जीव)चे सर्व विकार स्वरूपाला नाहीत. रागद्वेषादी परिणाम (बदल) परिच्छेद (विभाग,) व परिताप (व्यथा, वेदनादी) ह्यांचा स्वरूपाशी (आत्मा) स्पर्शही नसल्याने ह्या सर्व जीवाच्या असलेल्या अवस्था व्यापक आत्म्याला नसतात. पण 'मी जीव' ह्या भ्रमामुळे अशी शंका येते की -

शंका - आत्म्याला देह, मन, जगत् इत्यादिकांचे वास्तविक कोणतेच बंधन नसतांना उपनिषदे मुक्तीचा विचार सांगतात, तो कशासाठी? बंधन असते तर मुक्ती सांगणे योग्य होते.

उत्तर --

**यथा दर्पणाभाव आभासहानौ**
**मुखं विद्यते कल्पनाहीनमेकम्।**

**तथा धीवियोगे निराभासको यः**
**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।६।।**

अर्थ - आरसा दूर होताच आरशातील प्रतिबिंब दिसणे थांबून बिंबरूप चेहरा तसाच राहतो. त्यासंबंधी सर्व विपरीत कल्पना थांबतात. त्याप्रमाणे अन्तःकरण शांत होताच आत्मसंबंधीचे भ्रम दूर होऊन एकमेव आत्मा तेवढा उरतो. तो नित्यप्राप्त, नित्यसिद्धस्वरूप असलेला आत्मा मी आहे.।।६।।

आत्म्यावर बंधन आहे' असा भ्रम अन्तःकरण व त्यावरील अनेक संस्कारांमुळे होतो. हे संस्कार देह, मन व दृश्यासंबंधी असून ते जन्मोजन्मी दृढ झालेल्या स्थितीत राहतात. ह्यालाच अज्ञान, अविद्या इत्यादी नावे असून

मल, विक्षेप व आवरण हे त्याचे परिणाम असतात. ह्या सर्वांचा संबंध जीवाशी असून तो जेव्हा स्वतःचे मूळस्वरूप विसरतो तेव्हाच ते क्रियाशील होतात व सुखदुःखादी परिणाम करतात. मूळस्वरूपाचे स्मरण होऊन त्याचे स्थिर अनुभवात रूपांतर होते तेव्हा त्यालाच अन्तःकरणाच्या विस्मरणाचे स्वरूप येते. 'देह मी आहे', 'जग सत्य आहे', 'मी कर्ता भोक्ता आहे' इत्यादी भ्रम जेव्हा दूर होतात तेव्हा अन्तःकरणाच्या धर्मांचा स्वरूपावर भ्रम होणे थांबते. जीवाच्या प्रारब्धानुसार त्याचे जीवन चालू राहिले तरी अज्ञानावस्थेत होणारे क्रियाप्रतिक्रियांचे खेळ थांबून स्वस्थ, शान्त, तृप्त, सुखरूप व निर्भय जीवन्मुक्तावस्था प्राप्त

होते.

'मन हेच आत्मा आहे' असे मानणाऱ्या (चार्वाकादिकांच्या) मतांचे आता निरसन --

**मनश्चक्षुरादेर्वियुक्तः स्वयं यो**
**मनश्चक्षुरादेर्मनश्चक्षुरादिः।**
**मनश्चक्षुरादेरगम्यस्वरूपः**
**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।७।।**

अर्थ - मन व चक्षुरादी ज्ञानेंद्रियांपासून वेगळा, पण जो मनाचे मन व डोळ्याचा डोळा आहे; मन व डोळ्याने ज्याचे ज्ञान होत नाही, असा नित्यप्राप्त, नित्यसिद्ध आत्मा हे माझे स्वरूप आहे.।।७।।

डोळ्यासारखी ज्ञानेंद्रिये व अन्तःकरण (मन) ह्यांहून आत्मरूप मी वेगळा आहे. '**मनः**

**प्रग्रहमेवच**' (१-३-३) ह्या काठकश्रुतीनुसार बुद्धिरूप सारथ्याच्या हातातील मन हा लगाम आहे. लगामामुळे घोड्यांना हव्या त्या आज्ञा करता येतात व घोड्यांच्या तत्कालीन प्रवृत्तीही सारथ्याच्या लक्षात येतात. उदा. चार घोडे असतील तर त्यांतील दमलेला कोणता; चुकार, इतरांशी न जुळवून घेणारा, हटवादी इत्यादी कोणता ते त्याला कळतात. त्याप्रमाणे वासनेनुसार झालेले बुद्धीचे निर्णय मनामार्फत इंद्रियांपर्यंत पोहोचविले जातात व डोळ्यासारख्या ज्ञानेंद्रियाच्या साह्याने केलेल्या वाचनाचे निर्णय मनामार्फत बुद्धीपर्यंत पोहोचविले जातात. हे सर्व करून घेणारा जीव ह्या सर्वांपासून अज्ञान असेपर्यंत वेगळा असून

'आत्मा' हा जीवाहून वेगळा असतो. ही सरणी लक्षात घेतली तर एकमेव आत्मा प्रकाशक असून मन, डोळा इ. प्रकाश्य आहेत व ती स्वतः अचेतन आहेत हे कळते. चिदाभासामुळे होणारे ज्ञान त्यांनाच होते असा भ्रम होतो. ज्ञानेंद्रियांना त्यांच्या त्यांच्या विषयांचे ज्ञान होते. विषयांना इंद्रियांचे, इंद्रियांना चिदाभासाचे व चिदाभासाला आत्म्याचे ज्ञान होत नाही. चिदाभास आत्मरूप होताच 'त्याला ज्ञान झाले' असे म्हटले जाते.

शंका – आत्मा जर इंद्रियांनी जाणता येत नसेल तर त्याचे ज्ञान होणार तरी कसे?

उत्तर ––

**य एको विभाति स्वतः शुद्धचेताः**
**प्रकाशस्वरूपोऽपि नानेव धीषु।**

**शरावोदकस्थो यथा भानुरेकः**

**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।८।।**

अर्थ - ज्ञानप्रकाशरूप आत्मा नित्यप्रकाशमान असून अन्तःकरण शुद्ध व शांत झालेल्या साधकांना त्याचा तो अनुभवाला येतो. आत्मा एकमेव असला तरी अन्तःकरणे अनेक असल्यामुळे त्यांत तो अनेक झाल्यासारखा वाटतो. सूर्य एकच असून अनेक मडक्यांतील पाण्यात त्याची कित्येक प्रतिबिंबे दिसतात त्याप्रमाणे हे लक्षात घ्यावे.।।८।।

'**तमेव भान्तमनुभाति सर्वं**' (कठ २-२-१५) ह्या श्रुतीनुसार सर्वांचे प्रकाशन करणारा आत्मा '**विवृणुते तनुं स्वाम्।**' (कठ १-२-२३) ह्या श्रुतीप्रमाणे तो स्वतःच जणू अनुभवाला

येतो, स्वतःच साधकांसाठी प्रकाशित होतो. ज्याच्या प्रकाशात सर्व दृश्य प्रकाशित होते म्हणजे त्याचे ज्ञान होते, त्या 'सर्वरूप' दृश्याचा अखंड पाठलाग केल्याने प्रकाशकाकडे म्हणजे 'दृक्'कडे सामान्य माणूस मुळीच लक्ष देत नाही. सिद्ध 'आत्मक्रीड' असतो, साधक 'साधनाक्रीड' असतो व बद्ध 'दृश्यक्रीड' राहतो. दृश्यात रमणारा तसाच राहतो. आत्मानात्म-विचार करीत दृश्याचा बाध करीत गेले असता नित्यप्राप्त व नित्यसिद्ध आत्म्याची जणू पुन्हा सिद्धी होते. 'दृश्य' ह्या शब्दाची व्याप्ती फार मोठी असून दैनंदिन जीवनात अंतर्भूत असणारे घर, कुटुंब, मित्र, व्यवसाय, समाज, राजकारण, वाहन, पैसा, प्रेम, द्वेष, काळजी इत्यादी सर्व

दृश्य आहेत. मानवी जीवन ह्या सर्वात आसक्तीने अडकून पडलेले असल्याने आत्मज्योती नित्यप्रकाशमान असूनही दिसत नाही.

ज्ञानरूप आत्मज्योती सर्व चेतनांच्या अन्तःकरणात एकदमच तेवत राहते हे कसे त्याचे स्पष्टीकरण --

**यथानेकचक्षुप्रकाशो रविर्न -**
**क्रमेण प्रकाशीकरोति प्रकाश्यम्।**
**अनेकाधियो यस्तथैकप्रबोधः**
**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।९।।**

अर्थ - एक सूर्य अनेक डोळ्यांना एकदमच दृष्टी देतो. क्रमाक्रमाने उजेड देऊन ती देत नाही. तसा एकच आत्मा सर्व अन्तःकरणांना एकदमच प्रकाशित करतो.।।९।।

तसेच --

**विवस्वत्प्रभातं यथारूपमक्षं**
**प्रगृह्णाति नाभातमेवं विवस्वान्।**
**यदाभात आभासयत्यक्षमेकः**
**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।१०।।**

अर्थ - सूर्याने दाखविलेल्या प्रकाशानेच डोळ्यांना दिसते. प्रकाशाशिवाय दिसत नाही. सूर्यालाही डोळ्यांना दृष्टी देण्याचे सामर्थ्य त्या दृष्टीमागील आत्मप्रकाशाने येते.।।१०।।

जीवसृष्टीमध्ये ज्यांचे डोळे उघडे आहेत, त्यांना सूर्य एकामागून एक क्रमाने दृष्टी देत नाही. तो उगवताच सर्वांनाच एकदम दृश्य दिसू लागते. त्याप्रमाणे सर्व शरीरातील डोळ्यांना एकदमच

दिसून, सर्वव्यापक आत्मा ज्ञान करून देतो. ज्या अंधारामुळे डोळ्यांना दिसत नाही, त्या अंधाराचेही 'हा अंधार' असे ज्ञान आत्मप्रकाशातच होते. खण्डणखाद्य ह्या ग्रंथात अंधाराची केलेली मीमांसा ह्याच हेतूने केली आहे. दाट धुक्याचे ज्ञान, जसे ते ज्याला पूर्ण झाकून टाकते, त्या सूर्याच्याच प्रकाशात होते तसे हे जाणून घ्यावे. येथे एक लक्षात घ्यावे की सूर्यप्रकाशात डोळ्यांच्या मदतीने जीवाला ज्ञान होते. ज्ञानरूप आत्म्याला ते होत नाही. कोणतेही होणारे ज्ञान (वृत्तिज्ञान) जीवचैतन्याला होते व ते अखंड ज्ञानरूप असणाऱ्या कूटस्थ चैतन्याच्या सत्तेवर होते. वेदान्तशास्त्राची ही समजावून घेण्याची गूढ जागा आहे. अनेक

प्रामाणिक साधकसुद्धा येथे चकतात. शिवाय सूर्याला प्रकाश देण्याचे सामर्थ्य ब्रह्माच्या सत्तेवर ईश्वराकडून त्याला मिळते. ब्रह्म अपाद, अपाणि, अनेत्र, अमन, अप्राण (मुंडक) इत्यादी असल्याने ते कोणतीच स्थूल वा सूक्ष्म कृती करीत नाही. त्यामुळे हे कर्तृत्व ईश्वरचैतन्याला द्यावे लागते. तसेच अध्यारोपाच्या सरणीच्या पूर्णत्वासाठी ईश्वराचा स्वीकार करून, तो ब्रह्माच्या सत्तेवर जड–चेतनात्मक सृष्टीचे नियमन करतो, असे म्हणावे. तो सर्व सृष्टीचा निर्माता, पालनकर्ता व संहारकर्ता आहे. ह्यासाठी ब्रह्मदेव, विष्णू व शंकर ही त्याची रूपे आहेत. मूळ माया ह्या देवतांचीही उत्पत्ती, स्थिती व लय पाहते असे आचार्य त्यांच्या स्तोत्रात म्हणतात. ईश्वर

करीत असलेल्या नियमनाचे वर्णन श्रुती करते – 'जो सूर्याच्या आत व्यापून राहतो, सूर्य ज्याचे शरीर आहे, ज्याला सूर्य जाणीत नाही पण जो आत राहून त्याचे नियमन करतो, तोच तुझा आत्मा आहे.' (बृह. ३–७–९) हीच श्रुती सर्व दृश्याच्या बाबतीत लावून घ्यावी. सर्व सृष्टीच्या नियामकाला नारायण म्हणतात. त्याच्या नियमनामुळे वारा वाहतो, सूर्य उगवतो, इंद्र व अग्नी त्यांची त्यांची कामे करतात.

एकच आत्मा अनेक जीवांच्या रूपाने कसा भासतो ––

**यथा सूर्य एकोऽप्स्वनेकश्चलासु**
**स्थिरास्वप्यनन्यद्विभाव्यस्वरूपः।**

**चलासु प्रभिन्नासु धीष्वेवमेकः**
**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।११।।**

अर्थ - सूर्याची प्रतिबिंबे ज्याप्रमाणे अनेक घटातील पाण्यात वेगळी वेगळी भासून त्या पाण्याच्या गुणधर्मानुसार (वाहते, गढूळ, शेवाळयुक्त, उथळ, खोल इ.) भासली, तरी तो जसा आहे तसाच राहतो, त्याप्रमाणे व्यापक आत्म्याचे जेव्हा अनेक जीवांच्या बुद्धीत प्रतिबिंब पडते तेव्हा तो बुद्धीच्या गुणधर्मांप्रमाणे (सात्त्विक, दुष्ट, स्वार्थी, हुषार, मठ्ठ इ.) वेगवेगळ्या धर्मांचा होत नाही, बदलत नाही.।।११।।

आभासवाद, बिंबप्रतिबिंबवाद किंवा अवच्छेदवाद इत्यादी प्रक्रिया सांगून

शास्त्रकारांनी आत्मा व बुद्धी ह्यांचा संबंध जोडून 'जीव' ही संकल्पना बसविली आहे. ही संकल्पना स्वीकारल्याशिवाय व तिच्यावर पूर्ण श्रद्धा ठेविल्याशिवाय जीवआत्मैक्याची संगतीच लागत नाही. श्रुतींची संगती लावणारी ब्रह्मसूत्रे व ह्या दोन्हींवर प्रदीर्घ टीका लिहिणारे श्रीशंकराचार्य व श्रीसुरेश्वराचार्यादी शास्त्रकार ह्यांच्या सश्रद्ध स्वीकृतीशिवाय साधकाचे एकही पाऊल पुढे पडणार नाही. श्रीभगवद्गीतेमध्ये तत्त्वज्ञाना-बरोबरच मानवी जीवनाचा पुरेपूर विचार केला आहे. दैनंदिन जीवन जगत असतांनाच तत्त्वज्ञानाचे मोक्षानुभावात रूपांतर कसे करावे ह्याचे सुंदर मार्गदर्शन अर्जुनाच्या निमित्ताने केले आहे. त्यामुळेच उपनिषदात श्रवण, ब्रह्मसूत्रात

मनन व गीतेमध्ये निदिध्यासन सांगितले आहे असे सर्वसाधारणपणे म्हणता येते. '**आत्मा वा अरे श्रोतव्यो**' इत्यादी प्रकारे श्रुतीने केलेल्या आज्ञांचे त्यामुळे पालन होते. परमार्थसोपान खुला व सुरक्षित होत जातो. तो 'सोपान' नाही हेही त्यामुळेच कळते व अनुभवाला येते.

आणखी एक दृष्टान्त (उदाहरण) --

**घनच्छन्नदृष्टिर्घनच्छन्नमर्कं**
**यथा निष्प्रभं मन्यते चातिमूढः।**
**तथा बद्धवद्भाति यो मूढदृष्टेः**
**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।१२।।**

अर्थ - सूर्य ढगांनी झाकल्याने अज्ञानी बालकाला सूर्याचा प्रकाश 'गेला' असे वाटते त्याचप्रमाणे अविद्येमुळे आत्मा झाकला गेला व

देहाने बंदिस्त (मर्यादित) झाला असे मोहित दृष्टीला वाटते. असा जो नित्यप्रकाशमान (ज्ञानप्रकाश) आत्मा, तो माझे स्वरूप आहे.।।१२।।

अविद्येच्या म्हणजेच मायेच्या विलक्षण व 'अघटित घटना पटीयसी' ह्या स्वभावामुळे जीवभाव (मी जीव आहे) घट्ट धरून बसलेल्या माणसाला स्वतःच्या स्वरूपाचे ज्ञान न होता तो रूपालाच घट्ट धरून राहतो. तो स्वरूपाने सर्वज्ञ, निरपेक्ष व्यापक (विभु), अविकारी इत्यादी असून तो स्वतःला त्या उलट अल्पज्ञ, देहाएवढा व जन्ममरणादी विकार असलेला मानतो. तो स्वरूपाने आनंदरूप असतांना स्वतःला दुःखे भोगणारा समजतो. अक्रिय असतांना कर्ता

मानतो. जीव स्वभावानेच आत्मरूप असतांना अविद्येमुळे जीवरूप, देहरूप समजतो. बंध व मोक्ष ह्या दोन्ही अविद्येने निर्माण केलेल्या कल्पना आहेत. मंद प्रकाशात दोरीवर भासलेला साप प्रखर उजेड टाकताच दिसत नाही कारण तो तेथे कधीच नाही व म्हणून तो तेथून जातही नाही. सापाची जागा दोरी घेत नाही. त्याप्रमाणे ज्ञान अज्ञानाला घालवीत नाही कारण अज्ञान सर्पाप्रमाणे कधीच नव्हते व नाही.

असंग आत्मा --

**समस्तेषु वस्तुष्वनुस्यूतमेकं**
**समस्तानि वस्तूनि यं न स्पृशन्ति।**
**वियद्वत्सदा शुद्धमच्छस्वरूपम्**
**स नित्योपलब्धिस्वरूपोऽहमात्मा।।१३।।**

अर्थ – सर्व जग नामरूपात्मक व जडचेतनात्मक आहे. तरीही त्या जगाचा आत्म्याला स्पर्शही होत नाही (अस्पर्शयोग – मांडुक्य कारिका). जीवाला असणाऱ्या तीन गुणांच्या अभिव्यक्ती तसेच कामक्रोधादी, जन्ममरण, यशापयश इत्यादींचाही त्याला स्पर्श होत नाही. आत्मा सतत विमल, अविकारी व अज, अजर व अमर आहे. तो मी आहे असे अधिकारसंपन्न होऊन चिंतन करावे.।।१३।।

संगभ्रांतीचे उदाहरण व समारोप --

**उपाधौ यथा भेदता सन्मणीनां**
**तथा भेदता बुद्धिभेदेषु तेऽपि।**
**यथा चन्द्रिकाणां जले चञ्चलत्वं**
**तथा चञ्चलत्वं तवापीह विष्णो।।१४।।**

अर्थ – हे निरपेक्ष व्यापक श्रीविष्णो! ज्याप्रमाणे स्फटिकाच्या तुकड्यांमध्ये पसरलेला सूर्यप्रकाश त्या तुकड्यांच्या संख्येएवढा नसतो त्याप्रमाणे अनेक जीवांच्या बुद्धीत व्यापून असणारा आत्मप्रकाश त्या बुद्धींप्रमाणे वेगळा वेगळा नसतो. सरोवरातील पाण्यावर तरंग उठले की त्यातील चंद्राचे प्रतिबिंब हालते असा भास होतो त्याप्रमाणे तुम्ही सुद्धा (श्रीविष्णू) अनेक बुद्धींप्रमाणे अनेक होता असे वाटते.।।१४।।

परमार्थक्षेत्रात 'उपाधी' ही संकल्पना समजावून घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय दृश्य प्रपंचापासून अलिप्त असलेला आत्मा समजुतीत बसत नाही. व्यापक स्वरूपाला ज्या कारणाने मर्यादा आली असे वाटते ते कारण स्वरूपाची

उपाधी असते. उदा. व्यापक आकाश (Space) एखाद्या कुंभाने मर्यादित होते तेव्हा त्याला कुंभाकाश (घटाकाश) असे नाव मिळते. पण प्रत्येक कुंभात, तो कुंभ तयार करून आकाश चेंडूतील हवेप्रमाणे भरत नाहीत. असलेल्या आकाशात कुंभ तयार करतात. कुंभ फुटला तरी त्यांतील आकाश व्यापक आकाशात 'जाऊन' मिळत नाही कारण ते त्यापासून (महाकाश) वेगळे कधीच झालेले नसते. त्याप्रमाणे जीव जन्माला येतो तेव्हा आत्मा त्याच्या बुद्धीत 'शिरत' नाही, व्यापक आकाशात लक्षावधी जीव जन्माला येतात व मरण पावतात. त्या मरणाचे वेळी आत्मा तसाच राहतो. तो येत-जात नाही. हा प्रासंगिक विचार

पाहिल्यावर स्फटिकाच्या तुकड्यांच्या दृष्टान्ताचा विचार करू. स्फटिक हा एक अत्यंत स्वच्छ व पारदर्शक पदार्थ आहे (काचेप्रमाणे). तो ज्या रंगाच्या कागदावर ठेवावा तो रंग स्फटिकाचा आहे असे वाटते. वास्तविक तो त्या रंगापासून अलिप्त असल्याने कागद दूर करताच त्या कागदाचा रंग स्फटिकात दिसत नाही. अद्वैत मकरंद या ग्रंथात कवी लक्ष्मीधरांनी स्फटिकाच्या पर्वताच्या कड्याचे उदाहरण दिले आहे. सूर्यास्ताच्या वेळी स्फटिकाच्या कड्यात आकाशांतील सुंदर रंग प्रतिबिंबित होतात, कडाच रंगीत भासू लागतो पण अंधार पडताच ते सर्व रंग नाहीसे होतात, स्फटिकपर्वताचा त्या रंगांशी प्रत्यक्षात काहीच संबंध नसतो त्याप्रमाणे

बुद्धी हुषार, मठ्ठ, हट्टी, उदार, धार्मिक, पाखंडी, क्रोधी, शांत इ. कशीही असली तरी तिचा आत्म्याला स्पर्शही होत नाही. बुद्धी जरी जीवाबरोबर आली व गेली तरी आत्मा येत वा जात नाही. तो असतोच असतो. 'ब्रह्म (आत्मा) असतचि असे' (दा.बो.) असे समर्थ म्हणतात.

बुद्धी ही आत्म्याची उपाधी असून विशेषण नाही हा सिद्धान्त समजावून घेणे आवश्यक आहे. साधकाला ती विशेषण वाटते. हा भ्रम दूर करून ती उपाधी आहे असा कायमचा निश्चय करावा. त्यामुळे उपाधीचे (बुद्धी) गुणधर्म उपाधेयाला (आत्मा) लावण्याचा दोष निघून जाऊन आत्मचिंतन सोपे होतो. विशेषण विशेष्याला सोडून कधीच राहत

नाही. उदा. फुलाचा रंग हे फुलाचे विशेषण आहे. त्याच्या जवळ असलेले पान ही त्याची उपाधी आहे. पानालाच फूल मानावे त्याप्रमाणे अविद्येच्या प्रभावामुळे बुद्धीचे काम, क्रोधादी धर्म हे आत्म्याचे आहेत असे वाटते.

असा हा भ. आचार्यांच्या शिष्योत्तमांपैकी एका शिष्याचा आटोपशीर ग्रंथ आहे. त्याला खुद्द आचार्यांनी विवेचक प्रस्तावना लिहिली हा त्याचा विशेष. आपण सर्व साधकांनी त्याचे यथार्थ चिंतन करून परमपावन होऊ या.

***